# सकाळ

सातारा, मंगळवार,
२६ ऑक्टोबर २०२१


## डॉ. मुजावर, डॉ. कारंडेंना गुणवंत शिक्षक पुरस्कार

सातारा, ता. २५ : कोल्हापूर येथील शाहू स्मारकात राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी संघ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर (प्रोटान) यांच्या वतीने झालेल्या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी कॉलेजच्या माजी उपप्राचार्या प्रो. डॉ. अनिसा मुजावर व भूगोल विभागातील प्रा. डॉ. सुभाष कारंडे यांना महात्मा जोतिराव फुले सत्यशोधक गुणवंत शिक्षक पुरस्कार मराठा सेवा महासंघाचे अध्यक्ष वसंतराव मुळीक, डॉ. सूरज पवार, प्रोटानचे राष्ट्रीय प्रभारी गोरखनाथ वेताळ, प्रा. अतुल कुंभार यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.



सातारा : पुरस्कार स्वीकारताना डॉ. अनिसा मुजावर. त्यावेळी वसंतराव मुळीक, डॉ. सूरज पवार आदी.

रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात डॉ. मुजावर यांनी इंग्रजी विषयाच्या प्राध्यापक म्हणून काम केले. ज्ञानदानाचे हे कार्य करताना त्यांनी महात्मा जोतिराव फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजात पोचवून समाजाला जागृत करण्याचे काम केले. तसेच डॉ. सुभाष कारंडे यांनीही भूगोल विषयाचे अध्यापन करतानाच सामाजिक बांधिलकी जपत फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने समाजात जनजागृतीचे काम केले आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. अनिलकुमार वावरे, उपप्राचार्या डॉ. रोशनआरा शेख व डॉ. रामराजे माने देशमुख, डॉ. सुभाष वाघमारे, रजिस्ट्रार डॉ. अरुणकुमार सकटे, अधीक्षक तानाजी सपकाळ, ग्रंथपाल प्रा. एकनाथ झावरे, विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांनी त्यांचे अभिनंदन केले.


ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा